## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २८/०३/२०१३ रोजी प्राप्त प्रकरण व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा.२७७, दिनांक ३०/०३/२०१३, १५/०४/२०१३ व ०३/०५/२०१३.

३) या कार्यालयाचे "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा.४१२, दिनांक ०६/०५/२०१३.

४) क्रिमीनल रिट पिटीशन क्रमांक १८३९/२०१३, १८४०/२०१३ व १८४१/२०१३ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०४/०७/२०१३ रोजी पारित केलेले निर्देश.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा. ६२३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०९/०७/२०१३.

### अंतरीम आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

दिनांक २०/०३/२०१३ रोजी या कार्यालयास सेक्टर १९ अे, गाडी अड्डा, वाशी येथे टँकरमधून विविध प्रकारच्या ऑईलची अवैधरित्या खरेदी, विक्री व चोरी केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी तसेच उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह धाड टाकुन घटनास्थळी काही इसम उभ्या असलेल्या टँकरमधील द्रवपदार्थाचा साठा हा टँकरच्या डाव्या बाजूस असलेल्या वॉल्वमधून पाईपच्या सहाय्याने पत्र्याच्या डब्यात गैरमार्गाने काढत असल्याचे पथकास आढळुन आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर घटनास्थळी असलेले टँकर क्रमांक एमएच-०४-इएल-३१११, एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-सीजी-४३१९, एमएच-४३-यू-४८५८, एमएच-०४-ईबी-५९८८, एमएच-०४-ईबी-५०४८, एमएच-४३-ई-९५९४, एमएच-०६-अेसी-१५७४, एमएच-०४-बीयू-६३३४ व एमएच-४६-एफ-३७५३ असे एकूण १० टँकर तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळावरील परिसरात गैरमार्गाने टँकरमधील काढण्यात आलेला लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा व टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ मधील द्रवपदार्थाचा साठा हा जागीच जप्त करुन संबंधिताविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-बीयु-६३३४ व एमएच-०४-ईएल-३१११ चे मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अनुक्रमे क्रमांक १८३९/२०१३, १८४०/२०१३ व १८४१/२०१३ अन्वये रिट पिटीशन दाखल केले आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त असलेले टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ या टँकरमधील मिथेनॉलचा साठा असल्याने व तो साठा जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसल्याने सदरचा साठा हा या कार्यालयाच्या दिनांक ०६/०५/२०१३ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये साठा मालकास बंधपत्र घेवुन परत करण्यात आला आहे. तथापी, टँकर क्रमांक एमएच-०४-बीयु-६३३४ व एमएच-०४-ईएल-३१११ या दोन्ही टँकरमध्ये ल्युब्रिकेटींग ऑईलचा साठा जप्त आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम २(a)(viii) अन्वये नमूद व्याख्येमध्ये पेट्रोलियम अँड पेट्रोलियम प्रॉडक्ट्स हे समाविष्ठ असल्याने तसेच सदरचा पेट्रोलियम पदार्थाचा साठा हा घटनास्थळी अनधिकृत इसमांनी गैरमार्गाने प्राप्त करुन विविध ड्रममध्ये विनापरवाना साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन आले आहे. उपरोक्त टँकरचे मालक/वाहतुकदार यांना साठा मालकांनी त्यांचा साठा हा द्वारपोच करण्यासाठी प्राधिकृत केल्याची या कार्यालयाची धारणा आहे. तथापी, सदर टँकरच्या चालकांनी टँकर भरल्यानंतर तो नियोजित ठिकाणी वितरणासाठी घेवुन न जाता त्यांनी घटनास्थळी अनधिकृत इसमांशी संगनमत करुन टँकरमधील साठ्याची अवैधरित्या विक्री करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. जप्त टँकरचे मालक/वाहतुकदार यांनी त्यांच्या अधिपत्याखालील चालक हे टँकर भरल्यानंतर नियोजित ठिकाणी घेवुन जात आहेत किंवा कसे ? याची खातरजमा करण्याची त्यांची जबाबदारी आहे. तथापी, या प्रकरणी टँकरचे मालक/वाहतुकदार यांनी अक्षम्य निष्काळजीपणा दाखवुन साठा मालकांची विश्वासर्हता गमावल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वरील नमूद तीनही टँकर बाबत दिनांक १०/०७/२०१३ पुर्वी योग्यते आदेश पारित करण्यास निर्देशित केले असल्याबाबत अतिरिक्त सरकारी वकील श्री. जे.पी. याज्ञिक यांनी त्यांच्या दिनांक ०८/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सबब, टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-बीयु-६३३४ व एमएच-०४-ईएल-३१११ या तीनही टँकरबाबत न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, यांचेकडून प्राप्त होणाऱ्या रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अधिन राहुन अंतरिम आदेश पारित करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

## अंतरीम आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ मधील मिथेनॉलच्या साठ्याबाबत दिनांक ०६/०५/२०१३ रोजी पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त टँकर क्रमांक एमएच-०४-बीयु-६३३४ व एमएच-०४-ईएल-३१११ या दोन टँकरमधील ऑईलचा साठा हा पंचनाम्यात नमूद प्रत्येकी रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रत्येकी हमीवर (बँक गॅरंटी) त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत.

३) जप्त करण्यात आलेले टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-बीयु-६३३४ व एमएच-०४-ईएल-३१११ हे टँकर पंचनाम्यात नमूद प्रत्येकी रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रत्येकी हमीवर (बँक गॅरंटी) त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत.

४) सदरची बँक गॅरंटी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी साठा मालक व टँकर मालकांची राहील.

५) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू टँकर्स वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

६) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश या प्रकरणी रासायनिक पृथ:करण अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्गमित करण्यात येतील.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र.एमएच ०४ डीके ७६८९ चा मालक शेख हजरत हुसेन अली हुसेन.
२) टँकर क्र. एमएच ०४ बीयू ६३३४ चे मालक दिलीपकुमार पारसनाथ सिंग
३) टँकर क्र. एमएच ०४ बीयू ६३३४ मधील साठा मालक
४) टँकर क्र.एमएच ०४ ईएल ३१११ चा मालक सफीर अहमद चौधरी
५) टँकर क्र.एमएच ०४ ईएल ३१११ मधील साठा मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
३) ~~निवड नस्ती.~~

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.